प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 4 Issue 11 AUGUST 2012 Rs. 25

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

आता लोक या वास्तवाबद्दल जागृत होत आहेत की, लवकरच महान बदल घडतील. जे लोक प्रकाशकार्यात सामील आहेत, त्यांना, या वर्षाच्या शेवटी किंवा त्यानंतर, बदल हा घडणारच याबद्दल खात्री आहे. आणि आपल्याला म्हणजे ऋषींच्या किंवा लाइटमास्टर्सच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या लोकांना माहीत आहे, की आपण सध्या आपल्या नवयुगात प्रवेशाच्या परिवर्तन–काळात आहोत. परिवर्तनाच्या प्रक्रिया खूप वर्षांपूर्वी सुरू झाल्या होत्या आणि त्या आता तीव्र होत आहेत. संपूर्ण परिवर्तन त्वरित या वर्षाअखेरी घडेल की हळूहळू काही वर्षांमध्ये घडेल, ह्याची स्पष्ट कल्पना अद्याप आपल्याला नाही. या प्रक्रियांचे निरीक्षण करणाऱ्या मास्टर्सनी त्याबद्दल अद्याप ठरवलेले नाही.

आपण हे ओळखायला हवे की, हा काळ संधीचा एक महान काळ आहे. ही संधी आहे शीघ्र आध्यात्मिक प्रगती करण्याची. केव्हातरी आपल्याला पारमार्थिक व्हावेच लागेल. आपल्याला चांगले, प्रामाणिक आणि शांतीपूर्ण व्हावेच लागेल. नवयुगात प्रवेश करण्यासाठी आणि जगण्यासाठी हे अगदी आवश्यक आहे. त्याला पर्याय नाही. आपल्याला पारमार्थिक होण्याची निवड करून बदलावेच लागेल. जे लोक परमार्थ निवडणार नाहीत आणि बदलणार नाहीत, त्यांचा नाश होईल. हे एक वास्तव आहे, हे आपल्याला कळायला हवे.

परिवर्तनाच्या या काळात, वेगवेगळ्या प्रक्रिया काम करू लागतात. आपण वैयक्तिक पातळीवर एक प्रकारच्या आंतरिक खळबळीतून आणि परिवारापासून सुरुवात करून समाज, देश आणि जागतिक अशा सर्व पातळ्यांवर एक प्रकारच्या खळबळीतून जाऊ शकतो. ह्याच्यामुळे आपण जगण्याच्या उत्साहाला विरू देऊ नये. आपण हे ओळखायला हवे की, ही आंतरिक खळबळ आपल्याला जीवनाबद्दल, मूल्य व्यवस्थेबद्दल, जीवनाच्या उद्देशाबद्दल, मृत्यूनंतरच्या जीवनाबद्दल, नवयुगाबद्दल आणि इतर अशा अनेक वास्तवांबद्दल विचार करायला लावण्यासाठी निर्माण केली गेली आहे, ज्यांच्याबद्दल जाणून घेण्याची तसदी आतापर्यंत आपण कधीच घेतलेली नाही. या वास्तवांना समजून घेणे आणि योग्य रीतीने शांतीपूर्ण जीवन जगायला शिकणे हा सर्व पातळ्यांवरील सर्व खळबळींचा उद्देश आहे. एकदा का आपण हे जाणून घेतले आणि योग्यरीत्या जीवन जगू लागलो, की ही खळबळ नाहीशी होते. समस्या नाहीशा होतात. विश्व आपल्याला, त्याची कृपा आणि प्रेम यांचा वर्षाव करून, आपला हात धरून उच्च जीवनाकडे नेते.

महर्षी अमरांनी आपल्याला कित्येक अज्ञात वास्तवांबद्दल दुर्मिळ आणि आवश्यक ज्ञान दिले आहे. या ज्ञानाच्या मदतीने आपण एका उपनिषदाची भर घालू शकतो. महर्षी अमर आणि महान ऋषी, नवयुगात प्रवेश करण्यासाठी आपल्याला नवे ज्ञान आणि नवी तंत्रे पुरवत आहेत. हे ज्ञान आपल्याला समजून घ्यावे लागेल आणि इतरांवर न लादता आणि कोणताच व्यापारी हेतू न बाळगता लोकांपर्यंत पोचवावेही लागेल. प्रकाशाद्वारे क्रांतीचा हा एक भाग आहे. ज्ञान हा प्रकाशाचा एक भाग आहे. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. ३००/–**
**ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



**१४ जुलै, २०१२ – तपोनगर रहिवासियांच्या एका टीमने एकत्र येऊन तपोनगरात पसरलेला प्लास्टिक बॅग्सचा कचरा काढून परिसर स्वच्छ केला**

### काही ठळक घडामोडी

- गुरुजींकडून दीक्षा आणि मार्गदर्शन घेण्यासाठी जुलैच्या दुसऱ्या रविवारी 'शं'बला गटाची बैठक आणि तिसऱ्या रविवारी 'रा'गटाची बैठक झाली.
- २६–८–२०१२ रोजी तपोनगर येथे महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्यासाठी २३–८–२०१२ पर्यंत नाव नोंदवावे.
- तपोनगर व आनेकल येथील आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात ३–७–२०१२ रोजी दुपारी १२ ते १ पर्यंत गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित केलेल्या विशेष ध्यानात २०० पेक्षा आधिक ध्यानसाधकांनी भाग घेतला.

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०२ | गुरुवार | पौर्णिमा |
| ०९ | गुरुवार | श्रीकृष्ण जन्माष्टमी |
| १५ | बुधवार | शिवरात्री |
| १७ | शुक्रवार | अमावास्या |
| २५ | शनिवार | महर्षी अमरांचा महासमाधी दिवस / शुक्लाष्टमी |
| २६ | रविवार | महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त कार्यक्रम |
| ३१ | शुक्रवार | पौर्णिमा |
| १२ | मंगळवार | कृष्णाष्टमी |

**गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक शनिवार, ११–८–२०१२ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.**

### तपोनगरातील कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| दर रविवारी | – | व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत |
| | – | विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| गुरुवार ०९ | – | श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त विशेष ध्यान, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार २६ | – | महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त कार्यक्रम |

### महर्षी अमर महासमाधी कार्यक्रम
### २६–८–२०१२, रविवार

| | |
|---|---|
| सकाळी ११ वाजता | स्वागत |
| | वरिष्ठ साधकांचे व्याख्यान |
| | गुरुजींचे व्याख्यान |
| | पुस्तकाचे प्रकाशन |
| | विशेष ध्यान |
| | गुरुजींकडून आशीर्वाद |
| दुपारी १२.३० वाजता | प्रसाद |

**स्पीकिंग ट्री वर मास्टर्सच्या सूचीत गुरुजींचे नाव आले आहे. त्यांचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.**

गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई–मेल द्वारा संपर्क साधावा.

## "लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट" बद्दल वृत्तांत

- एक वयस्कर पण मनाने तरूण असलेल्या स्वयंसेविका सकाळी लवकर प्रकाश प्रवहनाच्या कामाला सुरुवात करतात. प्रकाश गुरूंकडून मिळालेला प्रकाश लोकांपर्यंत पोचवण्यासाठी त्या अनेक शाळांना भेट देतात. प्रकाश प्रवहनाचा परिचय करून देण्याची संधी जर कोणी नाकारली तरी त्या नाउमेद न होता उत्साहाने काम करतात आणि या कामासाठी कधीकधी कारने शंभर किलोमीटर पेक्षाही जास्त प्रवास करतात. संध्याकाळी उशीरापर्यंत त्या ह्या कामात गुंतलेल्या असतात. त्यांनी केलेल्या कोणत्याही कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न न करता शांतपणे त्यांचे काम चालू आहे. प्रकाश गुरूंविषयी असलेल्या त्यांच्या प्रेमामुळे त्यांच्या जीवनाला एक उच्च हेतू मिळाला आहे.
- अशा स्वयंसेवकांच्या प्रयत्नांमुळे जून महिन्यात ७० पेक्षा अधिक शाळांतील २५,००० नवीन मुलांचा परिचय प्रकाश प्रवहनाशी करून देण्यात आला. त्यांनी आयोजित केलेल्या ३०० पेक्षाही अधिक प्रकाश प्रवहनाच्या सत्रांत एक लाखापेक्षा जास्त मुलांनी भाग घेतला. ■

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

निरनिराळ्या शाळांतील प्रकाश प्रवहनाच्या सत्रांनी पुष्कळ सद्भावना आणि आनंद निर्माण केला आहे. एस. एस. सी. च्या विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या माझ्या दैनिक नित्यक्रमाची सुरुवात आम्ही प्रकाश प्रवहनाच्या सरावाने करतो. मुलांना देखील ही प्रक्रिया आवडते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना ताजेतवाने झाल्यासारखे वाटते. त्यांच्यापैकी काही जणांचे अनुभव उल्लेखनीय आहेत.

लग्न ठरलेल्या एका तरुण मुलीची किडनी बिघडली असल्याचे अचानक रोगनिदान झाले. सुमारे ८० विद्यार्थ्यांनी मन:पूर्वक दररोज प्रकाश प्रवाहित केला आणि अजूनही करीत आहेत. आम्हाला असे कळले आहे की तिची किडनी आता २५% क्रियाशील झाली आहे.

अलीकडे एका विद्यार्थ्याच्या वडिलांना भयंकर अपघात झाला. आम्ही प्रकाश प्रवहन करण्यास सुरुवात केली. त्यांना असलेला धोका आता टळला आहे आणि त्यांच्या तब्येतीत त्वरित सुधारणा होत आहे.

एका चार वर्षाच्या मुलीस एका ऑटोरिक्षाचा भीषण तडाखा बसला. ती वाचण्याची शक्यता धूसर होती. तरी आम्ही संपूर्ण श्रद्धेने प्रकाश प्रवाहित केला. आता तिचा धोका टळला आहे.

– जयंती नटराजन

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

जून महिन्या बरोबरच मानवजातीच्या नियतीतील ज्या वर्षाबद्दल जास्तीतजास्त अटकळ बांधली जात होती त्याचा पूर्वार्ध संपला. त्याच्या आगमनाने आम्हाला आत्मनिरीक्षण करण्याकडे वळवले. ह्याची सुरुवात चार तासांच्या ग्रहणाने झाली. प्रकाश प्रवहन करण्यासाठी पुष्कळ जण तपोनगरात जमले होते. संध्याकाळी प्रवहनाचे सत्र संपल्यावर ध्यानसाधक चहा घ्यायला डायनिंग हॉल मध्ये गेले असताना त्यांच्या तीव्र ध्यानाची गहनता समजू शकणाऱ्यांच्या लक्षात येण्याजोगी होती.

मानसाच्या प्रशासकीय कार्यालयात आता तेथे काम करणाऱ्या स्वयंसेवकांचे वाढदिवस साजरे करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. ह्यामुळे गुरुजींसोबत वार्तालाप करण्यासाठी आणखी संधी मिळते. जून महिन्यात श्री. सुधाकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

जरी आत्ता इथे राहाणारे आम्ही तीस एक जण असलो तरी तपोनगरातील रहिवाशांची संख्या अजून वाढते आहे. गेल्या महायुगात ह्या जागी जवळजवळ तीनशे रहिवासी होते. श्री. विकास कारंथ यांनी त्यांच्या नवीन घराच्या वास्तू शांतीसाठी गुरुजी आणि सर्व तपोनगरवासीयांना आमंत्रित केले होते. आम्ही प्रकाश प्रवाहित केला आणि त्यांच्या सुंदर घरात ऊर्जा पसरवल्या. त्यानंतरच्या रविवारी त्यांनी इतर ध्यानसाधकांचे देखील त्यांच्या घरास आशीर्वाद देण्यासाठी स्वागत केले.

तपोनगरात अनेक घरांचे बांधकाम चालू असल्याने रहिवाशांच्या मासिक बैठकीला रहिवासी मोठ्या संख्येने हजर असतात. अशा लोकसमूहाची कल्पना महर्षी अमरांनी केली होती आणि गुरुजी प्रत्यक्षात उतरवित आहेत. तपोनगरवासीयांनी दुसरी शंबला निर्माण करण्याची त्यांची जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांना सर्व सुविधा आधीच उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

०३–०६–२०१२

माझ्यापासून खूप दूर राहणाऱ्या लोकांना माझ्या निकट असल्यासारखे वाटते. खरे तर आपल्यात अंतर नसतेच. परंतु, तपोनगरातच राहात असलेल्या काही लोकांना हा निकटपणा कदाचित जाणवत नसेल.

सांप्रतचा काळ विकासाच्या महान संधींचा काळ आहे. या काळात थोड्या प्रयत्नांनी सर्वोच्च ध्येय गाठता येईल. अशा वेळी आपल्याला जगापासून, लोकांपासून स्वत:ला दूर ठेवावे लागेल; पण या जगापासून तुमचे नाते कधीही पूर्णपणे तोडू नका. अति बोलणे व वायफळ चर्चा टाळा. त्यामुळे वाचणारी ऊर्जा, सवड आणि संधी आपल्याला विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी उपयोगी येईल.

भौतिक ब्रह्मांडात तारामंडळांच्या मध्ये असलेले अंधारे अवकाश म्हणजे अव्यक्त ईश्वर आहे. आणखी एक खूप सुरस मुद्दा आहे. आनंदमय कोशाच्या सभोवती एक प्रकारचे अवकाश, एक आकाश असते जे ईश्वराचा अव्यक्त भाग आहे. येथून आपण बरेच काही मिळवू शकतो. याची जाणीव ठेवा. ऋषींनी ह्या जागेचे वर्णन चिदाकाश असे केले आहे. मुठीच्या आकाराच्या आकाशाला अनुभवण्याचा प्रयत्न करा. त्याची आपल्याला सदैव समतोल राखण्यास, विषयांकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्यास, सर्व प्रकारच्या द्वंद्वांवर व निष्प्रेमावर मात करण्यास मदत होते. ते आपल्याला जगापासून योग्य अंतर राखण्यास आणि नात्यांचा तोल सांभाळण्यास मदत करते. दररोज तीन मिनिटे याचा अभ्यास करा. जास्त वेळ याचा अभ्यास कराल तर संसारातला तुमचा रसच निघून जाईल. तेव्हा हे जरा जपून करा.

साधनेमध्ये आणि एकदा तुम्ही जीवनपथ निवडला की नेहमीच तुम्हाला कसोट्यांना, मोहांना आणि लक्ष विचलित करणाऱ्या विषयांना सामोरे जावे लागेल. तुम्ही निवडलेल्या मार्गाला धरून राहिले पाहिजे. एकदा निवड केल्यानंतर तुम्ही जर मार्ग बदलला तर तुम्ही कदाचित अधिक चांगल्या मार्गावर जाल परंतु, तुमचा पुष्कळ वेळ आणि ऊर्जा वाया जाईल. म्हणून फार जागरूक राहा.

नकारात्मकता केवळ आपली परीक्षा घेण्यासाठी व आपल्याला सुधारण्यासाठी असते. ती आपल्या सदसद्विवेकबुद्धीला टोचणी देण्यासाठी असते. पण आपण त्यातच पूर्णपणे रुतून जाऊ नये. आपण तिला बळी पडू नये. यावर चिंतन करा. तोच कदाचित द्वंद्वांची निर्मिती करण्यामागचा ईश्वराचा हेतु असेल. आपण आपल्यामधील नकारात्मकता ओळखावी आणि आपण निवडलेल्या मार्गाला धरून राहावे.

कार्याला व साधनेला पूर्णपणे वाहून घेणे चांगले असते. पण आताच्या घडीला मला सांगावेसे वाटते की तुम्ही तसे करू नये. हे जग आपल्या कसोटीचे क्षेत्र आहे. स्वत:ला जगापासून वेगळे करू नका. तुमच्या कामाच्या ठिकाणी कराव्या लागणाऱ्या संघर्षांतून आणि जेव्हा तुम्हाला तापदायक माणसांबरोबर व्यवहार करावा लागतो तेव्हा तुमची आध्यात्मिक सत्यांशी ओळख होते, तेव्हा तुम्हाला तुमच्या ताकदीचा अंदाज येतो आणि मग तुम्ही तुमची ताकद वाढवू शकाल.

अपयशाने माणूस सहजच निराश होतो; त्याला पराभूत झाल्यासारखे वाटते. एका अर्थी अपयश चांगले असते. आतापेक्षा चांगली संधी देणारा दरवाजा नेहमीच उपलब्ध असतो आणि असे अनेक बंद दरवाजे आहेत जे आपण अजून उघडलेलेच नाहीत.

तुम्ही तुमचे टेबल कसे लावता, तुमचे विचार कसे सुसंघटित करता, तुमचे अग्रक्रम कसे आखता यासारख्या छोट्या छोट्या गोष्टींपासून तुमच्या आध्यात्मिक जीवनाची व साधनेची सुरुवात होते. एक शंबला तत्त्व असे सांगते की तुम्ही जीवनावर प्रेम केलेच पाहिजे. प्रत्येक गोष्ट सुव्यवस्थित ठेवली पाहिजे. तेव्हा प्रत्येक तपशीलाला महत्त्व द्या. त्याला प्रेमाची जोड द्या.

ग्रहणांच्या काळात मोठे बदल घडतात. यापुढे तुमच्या कृतींची जबाबदारी तुम्हाला घ्यावी लागेल. तुमची प्रत्येक कृती योग्य असेल जेव्हा तुम्ही ती प्रेमाने कराल. तुम्ही जर चूक केली तर माफी मागा की तो विषय तिथेच संपेल. आपण निश्चयपूर्वक प्रेमाची निवड करू, आपल्या आचरणातून प्रेम प्रकट करू. म्हणजे मग, आपल्यापैकी कोणालाही कोणतीही समस्या येणार नाही.

१०–०६–२०१२

"आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण" हे पुस्तक हे नवीन उपनिषद आहे असे आपण म्हणू शकतो. तुम्ही ते वाचले तर तुम्हाला अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील. पुष्कळ प्रश्न सुद्धा निर्माण होतील. पण, मला वाटत नाही की हे पुस्तक वाचल्यानंतर तुमच्या मनात काही शंका उरतील.

आपण समजून घेतले पाहिजे की २०१२ सालाच्या शेवटी होणाऱ्या घटना, वैयक्तिक व जागतिक स्तरावर आपण अनुभवत असलेला गोंधळ, व्यवस्थांची पडझड आणि त्याचवेळी घडत असलेल्या अनेक चांगल्या गोष्टी एकाच प्रचंड प्रक्रियेचा हिस्सा आहेत. ही प्रक्रिया आपल्याला पुढच्या युगात नेते आहे. आपल्या अंतर्गत व्यवस्थेत पडझड होते आहे. आपण हे नि:संदिग्धपणे समजून घेतले पाहिजे. काही पडझड आपण होऊ दिली पाहिजे. नवीन युगात जाण्याच्या मार्गापासून ज्या ज्या गोष्टी आपल्याला अवरोध करतील त्या नष्ट झाल्या पाहिजेत. आपले अहंकार, आपले चुकीचे दृष्टिकोन, आपला गर्विष्ठपणा अशा अनेक गोष्टी किंवा आपण आपल्या पाठीवर वागवत असलेले ओझे फेकून देणे गरजेचे आहे. या चुकीच्या, अवजड ओझ्याची आपल्याला जाणीव जरी झाली तरी आपल्या अंतर्गत व्यवस्थेत पडझड सुरू होते. सर्व प्रकाश कार्यकर्त्यांचे कार्य एक आहे आणि या प्रचंड प्रक्रियेचाच तो भाग आहे. प्रकाश कार्यकर्ते कदाचित ऋषींच्या संपर्कात नसतीलही. पण, त्याने काही फरक पडत नाही. शेवटी सर्व ज्ञान ऋषींकडूनच मिळत असते.

आत्म्याच्या खोलीपासून निवड करणे महत्त्वाचे असते. निवड करणे ही वस्तुतः सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे. आपण संपूर्ण समर्पण करतो तेव्हाच आपण निर्धास्त होऊ शकतो कारण आपण निवड केलेली असते.

या अशा परिस्थितीत समर्पण व स्वीकार फार महत्त्वाचे आहेत आणि कठीणही आहेत. ग्रहणांच्या ह्या जोडीपासून ते नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या पुढच्या जोडीपर्यंत आपण अल्प प्रयत्नांनी महान परिणाम साधू शकतो, कारण आपल्याला ज्ञात व अज्ञात अशा विशेष ऊर्जा आपल्याला मदत करण्यासाठी काम करत आहेत. इत:पर, वैयक्तिक स्तरावर आपल्याला अनेक समस्या, परीक्षा व गोंधळाला सामोरे जावे लागेल. मी तुम्हाला विश्वास देतो की तुम्ही जर डोळे मिटून आमच्या मागून आलात तर आध्यात्मिक प्रगतीची उच्च शिखरे गाठाल.

आपण ज्या पायरीशी असू तेथून वर चढून सर्वोच्च शिखरावर पोचण्याची आपली वेळ आता आली आहे. जेव्हा काळ आपल्याला अप्रतिम संधी, ऊर्जा, उपदेश, ज्ञान उपलब्ध करून देतो आहे तेव्हा देवत्वाचा अनुभव का हुकवावा? आपण प्रयत्न करायलाच हवे.

आपल्याला नेहमी मुक्ती ही मिळतेच परंतु, आपण इथे एका विशिष्ट हेतुने आलो आहोत. तो आहे, जीवन शक्तीचा (लाइफ–फोर्स) अनुभव घेणे व आपल्या माध्यमातून तिला प्रकट करणे. कारण, तिच्यात ईश्वराचे प्रेम आहे. ते सभोवती पसरवणे हे अतिशय आल्हाददायी व समाधान देणारे काम आहे.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

मी स्पीडरायटिंगवर एक फार छान लेख वाचत होतो. तुम्ही स्पीडरायटिंगचा अभ्यास करू लागता तेव्हा एखादा प्रेतात्मा तुमच्या माध्यमातून लिहित असण्याचा धोका संभवतो. तो आपण महात्मा गांधी आहोत असे सांगेल! महान ऋषी, गुरु अशा कारणांसाठी तर सोडाच पण हितकारी हेतुंसाठी सुद्धा कोणाचे शरीर वापरत नाहीत.

सर्वोच्च अधिकारी मंडळ म्हणजेच सप्तर्षी फक्त ईश्वराच्या आधिपत्याखाली कार्य करतात. त्यामुळे त्यांच्याकडून मिळणारे ज्ञान एवढे संपूर्ण व अस्सल असते. आपण सुदैवी आहोत म्हणून सप्तर्षींचे थेट मार्गदर्शन आपल्याला लाभले आहे. आपल्याला जे काही ज्ञान मिळते ते आपण इतरांपर्यंत पोचवतो; ते त्याचा स्वीकार करोत वा न करोत.

पाच हजार वर्षांपूर्वी कलियुग सुरु झाले तेव्हा खूप लोक ही पृथ्वी सोडून इतर पृथ्व्यांवर राहावयास गेले. २०१२ सालानंतर ते ह्या पृथ्वीवर परत येतील.

१७–०६–२०१२

एक माणूस म्हणतो, 'मला बंदी असल्यासारखे वाटते. मला सुटका हवी आहे.' मी विचार केला, 'बंदी नाही असा इथे कोण आहे?' आपण आपापले मनोरे उभारतो, ते तुरुंगच खरे तर! या तुरुंगांतून बाहेर पडण्यासाठी आपण आध्यात्मिक साधना करू लागतो. प्रत्येक स्तरावर मुक्ती प्राप्त करणे हे साधनेचे उद्दिष्ट असते.

जेव्हा परस्पर संवादाची साधने बंद पडतील आणि तुमच्या टेलिपथी व इतर क्षमता जर विकसित झालेल्या नसतील तर तुम्ही आत्म्याच्या पातळीवरून माझ्याशी संवाद साधू शकता. तुम्ही ते आतापासूनही करू शकता. तुम्हाला पहिल्यांदा यश येणार नाही. कदाचित हजाराव्यांदा सुद्धा यश येणार नाही, पण तुम्ही प्रयत्न सोडू नका. साधना म्हणजे प्रयत्न, न संपणारा प्रयत्न, चिकाटीने केलेला प्रयत्न. तुम्ही कल्पना करा की तुम्ही प्रकाशाचा एक बिंदू आहात व मी दुसरा बिंदू आहे. आता कल्पना करा की एक प्रकाश किरण या दोन बिंदूंना जोडत आहे. त्यानंतर संवाद सुरू करा. बोला व नीट ऐका. संवाद घडेल, असा संवाद जो निर्मळ, स्पष्ट व निर्भेळ असेल.

ह्या सृष्टीच्या निर्मितीमागे असणारी, सर्व जीवनाच्या पाठीशी असणारी सर्वोच्च प्रज्ञा, सर्वोच्च शक्ती म्हणजे ईश्वर हे आपल्याला माहीत आहे. तुमच्या स्वतःच्या अनुभवाने, तुमच्या स्वतःच्या आकलनाने ही सत्ये जाणा.

हल्लीच एकाने मला पत्रात लिहिले की त्याची निराशा झाली कारण माझ्याकडून त्याला हवे तसे मार्गदर्शन मिळाले नाही. गुरु आध्यात्मिक मार्गदर्शक असतो. तो तुमच्या आध्यात्मिक प्रवासात तुम्हाला मार्गदर्शन करतो. त्यासाठी आवश्यक ते सर्व काही तो करतो. तुम्हाला ज्ञान, तंत्रे, ऊर्जा व प्रोत्साहन देतो आणि वेळप्रसंगी कान उघाडणी देखील करतो. तुम्ही जीवन व्यतीत करताना साधनेतून तुम्हाला मिळणारे विवेकचातुर्य वापरायचे असते. गुरुने काय करायला पाहिजे आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे काय केले नाही पाहिजे ते मला माहीत आहे कारण, गुरुंमध्ये सर्वश्रेष्ठ अशा माझ्या गुरु महर्षी अमरांकडून ते मी शिकलो. महर्षी अमर म्हणायचे की ऋषींना वाटते की प्रत्येकाने ऋषी बनावे; कोणी परावलंबी होऊ नये. तुम्हाला निर्णय घेतलेच पाहिजेत, मग ते चुकीचे का असेनात, पण जबाबदार बनून स्वतःचे निर्णय स्वतः घ्या. ऋषी सर्वांचे अज्ञान दूर करण्यासाठी झटत आहेत.

२० जूनपासून आषाढ मासाचा प्रारंभ होत आहे. या महिन्यातील प्रत्येक क्षण मंगल आहे कारण, या महिन्यात आपल्याला थेट परब्रह्म लोकातून उच्च कोटीच्या व अत्यंत शुद्ध ऊर्जा मिळतात.

२४–०२०१२

एका स्त्रीने मला पत्रात लिहिले की ती कधीच माझ्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. त्या निष्ठेमागची तळमळ मला कळली. ती अर्थातच मला खोलवर स्पर्शून गेली. मी तिला उत्तर पाठविले, 'तू कधीही माझा विश्वास मोडणार नाहीस.' जेव्हा जेव्हा तुम्ही क्रोधित होता, माझ्यावर नव्हे पण इतर कोणावरही चिडता तेव्हा माझी मान खाली जाते. मी तुमचा गुरु आहे. तुमची प्रगती होते तेव्हा मला आनंद होतो. तुमचे वर्तन जर योग्य नसेल तर माझ्या मते तुम्ही माझ्या विश्वासाला तडा देता.

ह्या धरेवर ऊर्जांद्वारा व्याधी बऱ्या करणारे अनेक जण आहेत. काही सत्ये आपण समजून घेतली पाहिजेत. व्याधी बऱ्या करणे ही बहुधा सर्वात उदात्त कृती आहे. उपचारक ऊर्जा पाठवून आपण मृत्यु टाळू शकत नाही आणि एखाद्या माणसाला आपण व्याधीमुक्त करू शकू याबद्दलही आपण खात्री देऊ शकत नाही. याचा अर्थ असा नव्हे की आपले प्रयत्न प्रभावी नाहीत किंवा आपण अकार्यक्षम आहोत. परंतु, काही इतर वास्तवेही असतात. बऱ्या करणाऱ्या हीलिंग ऊर्जा नेहमीच मदत करतात. त्या कदाचित मृत्यु टाळू शकणार नाहीत, पण त्या दिलासा देतात, आशा देतात. उपचार पद्धतीवरचा विश्वास गमावू नका, ती उपयुक्त आहे. ऊर्जांद्वारे उपचार देण्यामागे उच्च हेतु असतो. तो आहे त्या माणसाचा विकास करणे, त्याला समजण्यास भाग पाडणे की त्याने स्वतःला आध्यात्मिक बनवले पाहिजे. जर त्याने अशी निवड केली नाही तर उपचारांची मदत होणार नाही. त्याला त्रास होत राहील. शिवाय, ध्यान केलेच पाहिजे असे नाही किंवा तितके महत्त्वाचे नाही जितके आध्यात्मिक बनणे महत्त्वाचे आहे.

ईश्वर आपल्याला देणग्या देतो. आपल्याला वाटते की आपल्या प्रयत्नांनी आपण त्या मिळवल्या. तुम्ही कायम लक्षात ठेवा की देवाच्या इच्छेखेरीज तुम्हाला देणग्या मिळत नाहीत. तुम्हाला कदाचित एखादा रोग किंवा आजार असेल. देव तुम्हाला त्याच्या यातनांपासून वाचवतो कारण तुम्ही ध्यानसाधक आहात. आपल्यापैकी अनेक जणांकडे अनेक देणग्या असतात ज्या आपल्या खिजगणतीतही नसतात, मग त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे तर दूरच राहिले. प्रत्येक शांतीपूर्ण क्षण देवाची देणगी आहे याची जाणीव ठेवा. प्रथम आपण हे ओळखावे व नंतर गोंधळ होऊ देऊ नये. समाधान ही आपण आखलेली परिग्रहाची सीमारेषा आहे. त्यामुळे साधना करून देखील जर आपल्याला त्रास झाला, समस्या आल्या तर त्यासाठी आपल्याला स्वतःला दोष द्यायला पाहिजे. त्याचाही उपयोग होत नाही. आपण स्वतःत सुधारणा केली पाहिजे, अहंकार सोडला पाहिजे आणि आनंदात जगले पाहिजे.

जर कोणी व्यक्ती नियमित ध्यान साधना करीत असेल तर काळी जादू त्याला स्पर्श करणार नाही. तुम्ही घाबरू नका. माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा, तुमच्या स्वतःच्या साधनेवर विश्वास ठेवा. मनात भीती बाळगू नका. तुम्हाला कोणत्याही गोष्टीपासून भय नाही.

आपले जीवनातील उद्दिष्ट आहे आध्यात्मिक विकास करणे व ऋषींना मदत करणे. त्यामुळे आपण इतर कार्यांना हात घालत नाही. आपण लोकांशी शत्रुत्व घेत नाही. आपण तक्रार करत नाही. आता आपण इंटरनेटच्या माध्यमातून प्रकाशाद्वारे क्रांतीचा प्रसार करण्यावर प्रयत्न एकवटायचे आहेत. आम्ही आमच्या पातळीवर प्रयत्न करीत आहोत. ही माहिती इंटरनेटच्या अधिक वाहिन्यांवर सुद्धा उपलब्ध करून द्यावी असा मानस आहे. तुम्ही कामाला सुरुवात कराल तेव्हा आमच्याशी नेहमी विचारविनिमय करा आणि आमचे मार्गदर्शन घ्या. हे काम तुम्ही तुमच्या स्वतःच्या घरातून करू शकता. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## महर्षी अमर

श्यामला देवी, अनुवाद : प्रेरणा काळे

महर्षी अमर जेव्हा फक्त नऊ वर्षांचे होते, तेव्हा त्यांनी सूक्ष्म देहाने सूर्यलोकाला पहिला प्रवास केला होता. या मानवी पातळीवर त्यांना गुरु नव्हते. महान विश्वामित्र महर्षींनी त्यांना संपूर्ण योगशास्त्र व अध्यात्मशास्त्र शिकवले आणि त्यांना प्रशिक्षित केले. या सर्वांत प्रभुत्व मिळवून वयाच्या बाराव्या वर्षी महर्षी अमर ऋषी–कार्यकर्ते झाले. त्या क्षणापासून त्यांच्या अंतापर्यंत वेगवेळ्या पातळ्यांवर त्यांनी सप्त ऋषींसाठी कार्य केले.

जेव्हा समुद्रातील देवीने त्यांच्या सूक्ष्म पातळीवरील कार्यांपैकी एकाच्या गौरवाप्रित्यर्थ विशेष शक्तींनी युक्त असा एक सोटा त्यांना बक्षीस दिला, तेव्हा त्यांनी तो या पृथ्वीवरील ऋषी–कार्याचे प्रमुख असलेल्या मार्कण्डेय महर्षींना अर्पण केला. महर्षींनी त्यांना तो त्यांच्याजवळच ठेवण्यास सांगितले कारण त्यांना तो बक्षीस म्हणून मिळाला होता, पण महर्षी अमर म्हणाले की तो महर्षींकडेच असणे योग्य आहे. महर्षी अमर हे एक तत्त्वनिष्ठ व्यक्ती होते. ते ऋषींना पूर्णपणे समर्पित होते.

जेव्हा गुरुजी महर्षी अमरांना म्हणाले, की ते नक्कीच एक खास कार्यकर्ते असले पाहिजेत, तेव्हा ते म्हणाले, "प्रत्येकच कार्यकर्ता खास आहे. अन्यथा आम्ही ऋषींबरोबर कामच करू शकत नाही." एक महान महर्षी असूनही त्यांनी स्वतःला कधीच ऋषी म्हणवून घेतले नाही. महर्षी अमर संपूर्ण आयुष्यभर विनम्रतेचे साकार रूप होऊन जगले.

महर्षी अमर म्हणजे सामर्थ्य व वैभवाचे मूर्तिमंत रूप होते. एप्रिल १९८२ साली ते अंथरुणाला खिळले. अशा अवस्थेत त्यांना पाहिल्यावर धडधडत्या हृदयाने गुरुजींनी त्यांना एक प्रश्न विचारला. महर्षी अमर काहीच बोलले नाही आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ते एक माणूस पण होते ! मनाच्या पृष्ठभागावर असल्या, तरी मानवी भावना त्यांनाही होत्या.

महर्षी अमरांनी देह ठेवल्यानंतर एकदा दिवसभराच्या कामांनी गुरुजी थकले होते व त्यांचा डोळा लागला. महर्षी अमर सूक्ष्मरूपात आले आणि गुरुजींचा थकवा त्यांनी दूर केला. गुरुजींवर आणि सर्वांवर असं प्रेम ते बाळगत असत. आपल्यामधे नसूनही ते आपल्याला सतत प्रेम देणारे प्रेमाचा अवतारच आहेत. ■

## महर्षी अमर

शोभा राव, अनुवाद : प्रेरणा काळे

एका महान ऋषींकडून अडीच वर्षे प्रशिक्षण घेतल्यावर महर्षी अमरांना वयाच्या बाराव्या वर्षी ऋषी घोषित केले गेले. त्या महान ऋषींनी ध्यान आणि अध्यात्मशास्त्राशी निगडित संपूर्ण ज्ञान महर्षी अमरांना दिले.

महर्षी अमरांनी त्यांच्या कार्यात श्रेष्ठत्व मिळवले. त्यांचे कार्य मुख्य करून सूक्ष्म पातळीवर होते आणि मानवतेच्या कल्याणासाठी होते. "एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम" या पुस्तकात दिलेल्या त्यांच्या सूक्ष्म पातळीवरील कार्यांबद्दल वाचणे हा खरोखरंच एक महान अनुभव आहे. त्यांच्या कार्यांतून त्यांची महानता दिसते; त्यांची उदात्तता, त्यांचा धीर, त्यांची विनम्रता, भक्ती आणि ऋषींच्या कार्याप्रती त्यांची श्रद्धा दिसते.

आपल्या आयुष्यात महर्षी अमरांना गुरुजींनी आणले. त्यांच्याबरोबर ऋषीही आपल्या आयुष्यात आले. महर्षी अमरांशिवाय आपल्याला कधीही समजले नसते की ऋषी हे खूप दयाळू आहेत; त्यांनीच आपल्याला या पृथ्वीवर येथील जीवन अनुभवण्यासाठी आणले; आपल्या प्रत्येक जन्मात अत्यंत प्रेमाने आपली काळजी घेत, आपले मार्गदर्शन करत ते आपल्या सोबत राहिले आहेत. मानवजातीसाठी हा महान उलगडा आहे, हे अत्यंत हृदयस्पर्शी वास्तव आणि निस्पृह प्रेमाचा धडा आहे.

महर्षी अमर म्हणत, की देवाने आपल्याला, जीवनात जे सर्वोत्तम आहे, ते दिले आहे, त्याचा अनुभव आपण घेतला पाहिजे. त्यांनी आपल्याला जीवन शक्तीची (लाइफ–फोर्स) जाणीव करून दिली आणि तिला आपल्या जगण्यातून प्रकट करणे कसे महत्त्वाचे आहे ते सांगितले. ते सांगत की, जीवनातील सर्व तपशील कितीही लहान असले तरी महत्त्वाचे असतात आणि त्यांना प्रेमाने हाताळावे लागते. जीवनात सर्व पातळ्यांवर प्रेम प्रकट केले पाहिजे.

महर्षी अमरांनी आपल्याला ध्यान शिकवले. ध्यान आपल्याला आपले ईश्वराशी असलेले पण विस्मृतीत गेलेले नाते पुनरुज्जीवित करायला आणि अंततः जीवनाचा उद्देश पूर्ण करायला मदत करते. आपण महर्षी अमरांना अतिशय प्रेमाने व कृतज्ञतेने आठवतो, कारण त्यांनी आपल्याला ज्ञानाचा जो खजिना दिला आहे, त्यामुळे आपल्या जीवनाचा दर्जा बदलला आहे. गुरुजींमार्फत ते आपल्याला मार्गदर्शन करत आहेत आणि ते कायम आपल्या हृदयात राहतील. ■

# प्रश्नोत्तरे

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र: सूर्य आणि पृथ्वीच्या मधून ६ जूनला घडणाऱ्या शुक्र ग्रहाच्या संक्रमणामुळे काही परिणाम होईल का?**

उ: होय. शुक्राचे संक्रमण नव्या ऊर्जा प्रसारित करेल. त्याचा फार मोठा सकारात्मक परिणाम होईल. त्याचा प्रवास दर्शवतो की नजीकच्या भविष्यात युद्ध होणार नाही, सगळ्या पातळ्यांवर आणखी जास्त प्रमाणात शांती नांदेल. आपले जीवनमार्ग कोणतेही असले तरी आपण वास्तवांचा स्वीकार करू, त्यांच्याशी जुळवून घेऊ आणि आपल्या जीवनाचा उद्देश काय आहे याबद्दल विचार करायला सुरुवात करू. शुक्राच्या संक्रमणाची आपल्याला एक प्रकारची समतोल वृत्ती, एक प्रकारची समग्रता मिळवण्यास मदत होईल, जी एक महान आध्यात्मिक अवस्था असते. जागतिक नेत्यांना अंतर्मुख होण्यात आणि जगाच्या कल्याणासाठी चांगल्याप्रकारे कार्य करण्याच्या प्रयत्नात मदत होईल. आणखी मोठ्या प्रमाणात जागृती घडेल, उच्च प्रतीची जागृती घडेल. ही जागृती सुद्धा प्रकाशाद्वारे क्रांतीचा एक हिस्सा आहे.

**प्र: अंतिम संस्कार करणे गरजेचे असते का?**

उ: एखाद्या व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याचा आत्मा दहा दिवसांपर्यंत त्याच्या परिवारासोबत राहत असतो. त्याचे आता शरीरात वास्तव्य नाही आणि त्याने पुढील प्रवासासाठी तयारी करावी ह्याचे स्मरण करून देणे आणि त्याला शिक्षित करणे, हा अंतिम संस्कार करण्यामागील उद्देश असतो. मार्गदर्शक दूतही त्याला मार्गदर्शन करत असतात. समाजातील काही शाखांमधेच अंतिम संस्कार करण्याचा प्रघात आहे, सर्व शाखांमध्ये नाही. अशावेळी दूतच आत्म्याला ज्ञान देत असतात.

**प्र: नवयुगात आपण जसजसे पुढे जाऊ तेव्हा आपल्या उच्च स्वाभाविक क्षमता आणि संवेदनक्षमता आपोआपच जागृत होतील की त्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील?**

उ: आपण नवयुगात पुढे गेल्यानंतर सगळ्याच नाही, पण काही उच्च क्षमता आपोआपच जागृत होतील. त्याकरता सत्ययुगाच्या प्रारंभी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. एकदा आपण सत्ययुगात प्रवेश केल्यानंतर आपल्याजवळ असणाऱ्या सर्व स्वाभाविक क्षमता आणि संवेदनक्षमता जागृत होतील आणि त्या कार्यशील पण राहतील.

**प्र: यापुढे आपण आपल्या सूक्ष्म ग्रहणशक्तीची नोंद घेऊ शकू का, की पूर्वीप्रमाणे स्थूल ग्रहणशक्तीवरच आपल्याला निर्भर राहावे लागेल?**

उ: आपण सत्ययुगात अद्याप पूर्णपणे प्रवेश केलेला नाही. आपल्या शुद्धतेची पातळी तितकीशी उच्च स्वरूपाची किंवा परिपूर्ण नाही. याचा अर्थ असा नाही की आपण गोष्टींच्या सूक्ष्म बाबींना जाणू शकत नाही. सूक्ष्म बाबींची नोंद घ्या आणि स्थूल ग्रहणक्षमतेद्वारे त्याची खातरजमा करा, मला विचारून सुद्धा खात्री करून घ्या. याला आणखी एक बाजू आहे. काळ्या शक्ती आपल्याला गोंधळात टाकण्याकरिता विकृत गोष्टी पसरवत आहेत. त्यामुळे तुम्हाला काळजीपूर्वक राहायला हवे.

**प्र: आत्ता, २०१२ सालाच्या अंताआधी आणि २०१२ सालानंतर आम्ही काय केले पाहिजे?**

उ: प्रगती करायची हेच सध्या आपले काम आहे. स्वतःला जास्त प्रेमाने आणि ज्ञानाने सज्ज करा; प्रकाश प्रवाहित करा. इतरांना प्रकाश प्रवाहित करण्यात मदत करणे, हे पण आपले काम आहे. लोकांना प्रकाश प्रवहन करण्यासाठी सक्ती करू नका किंवा प्रकाशाचे प्रवहन त्यांच्यावर लादू नका. त्यांना सौम्यपणे आणि शांतपणे सांगा. २०१२ नंतरच्या काळात प्रचंड काम असणार आहे पण त्याचे नक्की स्वरूप आपल्याला अजून समजायचे आहे.

**प्र: कोणी या जगात व्यस्त राहून सुद्धा दिवसा भरत असलेल्या सूक्ष्म स्तरावरील वर्गांना हजर राहू शकतो का आणि त्याबद्दल अनभिज्ञ राहू शकतो का?**

उ: ते शक्य आहे. सूक्ष्मस्तरावरील आपल्याच कामांबद्दल आपण अनभिज्ञ असतो. ते माहीत राहण्याची आपल्याला आवश्यकता पण नसते. जर त्याबद्दल तुम्हाला माहीत झाले तर तुम्ही गोंधळून जाऊ शकता. त्या जीवनापेक्षा हे जीवन फार वेगळे आहे. ऋषी जे आपल्या प्रत्येकावर लक्ष ठेवून आहेत, ते आपल्याच सूक्ष्म स्तरावरील कामांबद्दल थोडी माहिती आपल्याला देत असतात. आपल्याला ती माहिती मिळावी असे जेव्हा त्यांना वाटते, तेव्हा ते असे घडू देतात. कसेनाकसे, दृष्टांत होऊन किंवा स्वप्नांमार्फत किंवा एकाएकी आपल्याला त्याविषयी माहीत होते. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| Preparing for 2012 | 100/- |
| Light Body & Other Realities | 75/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji - Vol 1, 3 & 4 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| Guruji Speaks Vol - 4 & 5 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis | 100/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ – सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करें (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |


## ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)
मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)
द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)
द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)
उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)
यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

## मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

## मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

## अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

## स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

## ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

## भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

## अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०-जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

# आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

ध्यान करताना काहीवेळा मला वाटले की मी फक्त प्रकाश आहे. माझा स्थूल देह अस्तित्वात नव्हता पण तरीही मी पूर्ण जागृत होते. ही अवस्था किती काळ टिकली ते मला माहीत नाही. त्यावेळी कोणतेही विचार नव्हते, होती ती फक्त रिक्तता.

– ॲन चॅपमन

दि. २९ जानेवारी २०१२ रोजी ध्यान करताना मी प्रकाशाचा व प्रेमाचा अनुभव घेऊ शकलो. १०८ फूट व्यास असलेला निळा प्रकाशगोल दृष्टीस पडला. तो खरंच अस्तित्वात होता. मी काहीही केले नाही आणि मला अंतरंगात स्तब्धता जाणवत होती. कोणतीही कारण मीमांसा न करता मी हे अनुभवण्यास सूरुवात केली. खोल अंतर्मनात मला माहीत होते की मी प्रकाश अनुभवत होतो. मी अनुभवत राहिलो आणि दोन तासांच्या ध्यानानंतर देखील ही तो अनुभव मी सोबत बाळगून होतो.

– विश्वास दीक्षित

ओरिएंटेशन ध्यानवर्गादरम्यान फोटॉन बेल्टला केलेल्या प्रवासाचा माझ्यावर खूप आल्हाददायक परिणाम झाला. फोटॉन बेल्टची देवता मला म्हणाली, "लोक मला घाबरतात. मी क्रूर नाही. माझे तुम्हा सर्वांवर प्रेम आहे. तुझ्यात देखील अमाप प्रेम आहे. तू फक्त स्वत:चा विचार करू नकोस. तुला सर्वांना सोबत घेऊन चालावे लागेल."

– अंजली पाटील

मी नेहमी ऊर्जेच्या उर्मींचा अनुभव घेते, त्या पाठोपाठ प्रकाशाचा उद्रेक होतो. काहीवेळा मी खूप आनंद अनुभवते. असे वाटते की जणू काही ऊर्जेचा माझ्या हृदयात उद्रेक होत आहे व प्रकाश विस्तार पावत आहे. संपूर्ण जीवनाशी मी जोडली असल्याचे मला जाणवते. मी माझ्या कुटुंबाप्रती जास्त काळजी करीत नाही. साक्षात परमेश्वरच माझे संरक्षण व संगोपन करीत आहे असे मला वाटते. एक प्रकारची आंतरिक जाणीव आहे की माझे भवितव्य माझ्या स्रोताच्या हाती सुरक्षित आहे.

– गीतांजली बालकृष्णन

माझ्या आतील व बाहेरील संपूर्ण जग बरेच शांत झाले आहे. जरी पूर्णपणे शक्य होत नसले तरीही मी इतरांवर आता बिनशर्त प्रेम करू शकत आहे. मला आपल्या आवडत्या पृथ्वी मातेप्रती जास्तीत जास्त प्रेम वाटते आहे.

– देबाशीश रथा

प्रकाश प्रवहनामुळे मला अशा अवस्थेचा अनुभव घेण्यास मदत होते जी दु:ख किंवा वेदनांच्या पलीकडे आहे. जेव्हा आपल्याला वेदना होत असतात तेव्हा बोलणे खूप त्रासदायक वाटते पण मी जेव्हा प्रकाशाबद्दल बोलते तेव्हा प्रचंड ऊर्जेच्या उर्मींचा अनुभव घेते व मला खूप आनंदी वाटते. प्रकाश प्रवहनाचे सत्र संपवून मी जेव्हा बाहेर पडते तेव्हा पुन्हा वेदना मला जाणवू लागतात.

– पद्मजा बालाजी

कधीतरी ती शक्ती ह्या शरीर-प्रणालीचा ताबा घेईल. तिला माहीत आहे की किती प्रमाणात व कधी ऊर्जा ह्या प्रणालीत भराव्या लागतील. आता ही शक्ती इतक्या सुंदरीतीने माझ्या संपूर्ण डोक्याचा ताबा घेते व मला उच्च पातळ्यांवर घेऊन जाते. मी शक्तिशाली व भव्य अशा गोष्टींशी एकरूप होते. त्यानंतर माझे शरीरही तिच्याशी एकरूप होते व मी विस्तारित होते. मी ह्या ऊर्जा क्षेत्राशी जोडली गेलेली असते. मला असे वाटते की ह्या ऊर्जा क्षेत्राच्या माध्यमाने परमेश्वराशी संवाद सुरू होईल. ही संपूर्ण प्रक्रिया खरंच अतिशय हृदयस्पर्शी आहे.

– विद्या विश्वामित्र

माझ्या एका न आवडणाऱ्या मैत्रिणीबद्दल जेव्हाही मी विचार करायचो तेव्हा माझ्यात द्वेष उत्पन्न होत असे. मला माझ्या नकारात्मक विचारांची लाज वाटत होती. मला हे थांबवायचे होते. म्हणून मी झोपण्यापूर्वी प्रार्थना केली. मी मनापासून तिला माफ केले व मी केलेल्या चुकांसाठी तिची माफी मागितली. मी स्वप्नात स्वत:ला एक अतिशय घाणेरडे स्नानगृह स्वच्छ करीत असताना पाहिले. ते दृश्य खूप खऱ्यासारखे होते. मला समजले की माझे वाईट विचार धुतले गेले होते. मी आता तिचा द्वेष करीत नाही.

– वासुकी अलवार

ह्या मार्गात येण्यापूर्वी मला मज्जारोगाचा त्रास होत होता. रात्री दुखण्याचा खूप त्रास होत असे व वेदनेमुळे मला झोप येत नसे. वैद्यांना त्याचे योग्य निदान करणे व औषध देणे खूप कठीण होते. मी आपल्या सूचनेप्रमाणे शंबला तत्त्वांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. आता मी हळूहळू या त्रासातून बरा होत आहे. या बद्दल गुरुजींना, ऋषींना व प्रकाशास धन्यवाद.

– भरत एस्

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande